"कृपया प्रसिध्दी करिता

माहिती व जनसंपर्क कार्यालय
पुणे महानगरपालिका
२६/०२/२०२६

-: प्रेस नोट :-

## होळीचे वेळी घ्यावयाची दक्षता

१) होळी पेटविताना होळीमध्ये मोठ्या प्रमाणावर जळाऊ पदार्थ अर्पण न करता, लहान स्वरूपातील होळी पेटवावी.

२) होळी पेटविताना ती मोकळया पटांगणावरच पेटवावी.

३) झोपडपट्या ह्या आगीच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील असल्याने झोपडपट्टीचे परिसरात नाममात्र होळीचे पूजन करत असताना दक्षता घ्यावी.

४) लहान मुलांना होळीचे जवळ जाऊ देऊ नये.

५) खबरदारीची उपाययोजना म्हणून होळी पेटविण्यापूर्वी होळीचे नजीक पाण्याने भरलेले लोखंडी पिंप व पाणी फेकण्यासाठी बादल्या उपलब्ध ठेवाव्यात.

६) छप्पर असलेल्या जागेत, विजेच्या ताराखाली होळी न पेटविता, मोकळ्या पटांगणात पेटवावी.

७) होळी जोपर्यंत पेटत आहे, तोपर्यंत लहान मुलांसमवेत प्रौढ व्यक्तींनी होळीजवळ सोबत राहावे.

८) होळीमध्ये फटाके टाकू नयेत.

९) आगीचा प्रादूर्भाव झाल्यास, आगीवर पाणी मारण्याकरिता पाण्याचा साठा त्वरित उपलब्ध राहण्याचे दृष्टीने २०० लिटर्सचे पाण्याचे भरलेले पिंप व पाणीफेकणेकरिता बादली ठेवण्यात यावी.

१०) ज्या इमारतीमध्ये एल पी जी / सी एन जी रेटिक्युलेटेड सिस्टीम आहे, अशा इमारतीमध्ये एल पी जी / सी एन जी सिलेंडर बँकपासून दूर अंतरावर होळी पेटवावी व अशा वेळेस सदर गॅस बँकेचा काळजी वाहक ( केअर टेकर ) कर्तव्यावर हजर असणे आवश्यक आहे.

११) वखारीचे आवारात अथवा लगत होळी पेटवू नये.

१२) होळीचे पूर्वी दोन दिवस व नंतरचे दोन दिवस वखारीतील रखवालदार किंवा मजूरांना रात्रीचे वेळी जागता पहारा देण्यास सांगावे.

१३) आगीचा प्रादूर्भाव झाल्यास, तेथील मजूरांना आगीवर पाणी मारण्याकरिता त्वरित पाण्याचा साठा उपलब्ध राहण्याचे दृष्टीने २०० लिटर्सचे पाण्याचे भरलेले पिंप वखारीमध्ये ठेवावेत. तसेच वखारीचे आवारात वाळूने भरलेल्या बादल्या ठेवण्यात याव्यात.

१४) बहुतांशी वखारीचे बाहेर मोठ्या प्रमाणात अस्ताव्यस्त लाकूड साठा केलेला असतो, अशा लाकूड साठ्यामुळे आग एका भागाकडून दुसऱ्या भागाकडे सत्वर पसरण्याचा धोका असतो. याकरिता अशाप्रकारे रस्त्यावर लाकूडसाठा राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

xxx /-

कळावे,

( देवेंद्र प्र. पोटफोडे )
मुख्य अग्निशमन अधिकारी
पुणे महानगरपालिका